सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०१/२०२६, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

संदर्भ:- महाराष्ट्र शासन,गृह विभाग,शासन निर्णय क्रमांक. संकीर्ण-०६२६/प्र.क्र.२६८/ विशा-३ (अ), दि.२३/०७/२०२६

विषय:- भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्र (I4C) च्या धर्तीवर महाराष्ट्र सायबर कार्यालयास राज्य सायबर गुन्हे समन्वय केंद्र (S4C) म्हणून घोषित करण्याबाबत

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग,शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-०६२६/प्र.क्र.२६८/विशा-३(अ) दि.२३/०७/२०२६, ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०७२३१२५१०७२३२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
Chandrashekhar Govindrao Shinde
Date: 24-07-2026 16:18:24

(चंद्रशेखर शिंदे)
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का) (अति.कार्यभार)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई. (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक,(आस्थापना/कायदा व सुव्यवस्था /आर्थिक गुन्हे/दहशतवाद विरोधी पथक/ विशेष कृती/ प्रशासन/ वाहतूक/ प्रशिक्षण व खास पथक फोर्स वन नागरी हक्क संरक्षण/ सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह)
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण,माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.

विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था/ प्रशासन/ प्रशिक्षण व खास पथके), (नियोजन व समन्वय) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे/ बिनतारी संदेश/लोहमार्ग).
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते २०
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.
सर्व कार्यासन अधिकारी, का क्र.१ ते ४४

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्र (I4C) च्या धर्तीवर महाराष्ट्र सायबर कार्यालयास राज्य सायबर गुन्हे समन्वय केंद्र (S4C) म्हणून घोषित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-०६२६/प्र.क्र.२६८/विशा-३(अ)
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक: २३ जुलै,२०२६

संदर्भ :-

१. गृह विभाग शासन निर्णय क्रमांक बैठक-०८२३/प्र.क्र.१५६/ विशा-३(अ), दि.२७.०९.२०२३

२. उप कमांडंट (सायबर क्राईम),सायबर क्राईम कक्ष, सायबर क्राईम व माहिती सुरक्षा विभाग, गृह मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र, दि.०९.०६.२०२६

३. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखालील दि.०१.०७.२०२६ रोजी आयोजित बैठकीचे इतिवृत्त.

४.अपर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य सायबर, मुंबई यांचे पत्र, दि.१६.०७.२०२६

प्रस्तावना :-

भारत सरकार नवी दिल्ली यांनी भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्र (I4C) सन २०१८ मध्ये स्थापन केले आहे. गृह मंत्रालय, भारत सरकार यांच्या दि. ०९.०६. २०२६ रोजीच्या पत्रान्वये सर्व राज्यांना I4C च्या धर्तीवर प्रत्येक राज्यात “राज्य सायबर गुन्हे समन्वय केंद्र” (State Cyber Crime Coordination Centre - S4C) स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत.

त्यानुषंगाने, दि.०१.०७.२०२६ रोजी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्पाची सद्यस्थिती व कार्यात्मक व्याप्ती लक्षात घेता, सदर महाराष्ट्र सायबर कार्यालयास “राज्य सायबर गुन्हे समन्वय केंद्र” म्हणून घोषित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

त्यानुसार अपर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य सायबर, मुंबई यांनी उपरोक्त संदर्भ क्र.४ येथील पत्रान्वये भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्र (I4C) च्या धर्तीवर महाराष्ट्र सायबर कार्यालयास “राज्य सायबर गुन्हे समन्वय केंद्र” (State Cyber Crime Coordination Centre - S4C) म्हणून घोषित करण्याबाबत शासनास विनंती केली आहे.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्पाची तांत्रिक, संस्थात्मक व कार्यकारी क्षमता विचारात घेता, भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्र (I4C) च्या धर्तीवर महाराष्ट्र सायबर कार्यालयास “राज्य सायबर

गुन्हे समन्वय केंद्र" (State Cyber Crime Coordination Centre - S4C) म्हणून घोषित करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्पांतर्गत कार्यरत खालील घटक यापुढे "राज्य सायबर गुन्हे समन्वय केंद्र" चे मुख्य कार्यात्मक स्तंभ म्हणून कार्यरत राहतील.

अ.क्र.	S4C मधील कार्यात्मक विभाग	महाराष्ट्र सायबर मधील घटक
1	Cyber Investigation Division	Nodal Cyber Police Station
2	State Digital Investigation Support Centre (S-DISC)	Technology Assisted Investigation (TAI)
3	State Cyber Crime Training Centre	Centre of Excellence (COE)
4	State Cyber Outreach, Research & Innovation Unit	Centre of Excellence (COE)
5	Administration Division	Administration Wing
6	Cyber Threat & Social Media Monitoring Division	Technology Assisted Investigation (TAI)
7	Emergency Response Division	CERT-MH
7A	Call Centre (1930)	Command & Control Centre
7B	State Cyber Fraud Mitigation Centre	MAHA GRID
7C	Online Crimes Against Women & Children	CCPWC, OCWC TRACE
8	Cyber Security Division	CERT-MH + Security Operations Centre (SOC)

३ सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०७२३१२५१०७२३२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

YAMUNA DHANANJAY JADHAV

Digitally signed by YAMUNA DHANANJAY JADHAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Home Department, 2.5.4.20=2C3DF382DDA9F94D60DC0EA9D4827D801C6EDC144E58FFD58ED3EF2FE7FB16A5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F6CCE4E8E68DFB65BCD1BA4CE35CF82E2B05A7DDC3056B9285E5C75F146B1EEA, cn=YAMUNA DHANANJAY JADHAV
Date: 2026.07.23 12:52:22 +05'30'

(यमुना जाधव)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई.
२. मा.राज्यमंत्री (गृह) शहरे /ग्रामीण, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई.
३. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई.
४. अपर मुख्य सचिव ,गृह विभाग, मंत्रालय,मुंबई.
५. सचिव, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुध्दिमत्ता विभाग, मंत्रालय,मुंबई.
६. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
७. पोलीस आयुक्त, मुंबई.
८. अपर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य सायबर, मुंबई.